# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**3 JULY, 2018**

[Time : 14-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करू नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती (डबल लाइन स्पेसिंग) अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

बँका आणि होम फायनान्स कंपन्या प्रामुख्याने बदलत्या व्याजदरानेच गृहकर्ज देतात. व्याजदरात वाढ झाल्यास मात्र ग्राहकाला वाढीव व्याजदर आकारला जातो. तसेच, व्याजदर कमी झाल्यास त्या प्रमाणात व्याजदरात कपात करण्यात येते.

गृहकर्जाच्या व्याजदरात किती वाढ होते, हे दोन बाबींवर अवलंबून असते. रिझर्व्ह बँकेने बँकांसाठी जाहीर केलेला व्याजदर आणि क्रेडिट रिस्क नफा इत्यादींसाठी बँकेकडून आकारण्यात येणारे अतिरिक्त शुल्क. रिझर्व्ह बँक अर्थव्यवस्थेचा आढावा घेऊन व्याजदर निश्चित करते. व्याजदर निश्चित करताना सरकारी उपक्रमासाठी आवश्यक निधी, महागाई यांचा अभ्यास करून त्या आधारे व्याजदर जाहीर केले जातात. गेल्या वर्षी महागाई कमी करण्यासाठी वेळोवेळी व्याजदर वाढवण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेने घेतला होता. सध्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी कमी व्याजदराने कर्जपुरवठा करण्याची सूचना सरकारतर्फे बँकांना करण्यात आलेली आहे. बँकाही आवश्यकतेनुसार आणि स्पर्धेत टिकून राहण्यासाठी किती वाढीव शुल्क आकारायचे, याचा निर्णय घेत असते. जेव्हा व्याजदरात वाढ होते तेव्हा बँका त्या प्रमाणात गृहकर्जाचा कालावधी वाढवतात. यामुळे ग्राहकाच्या ईएमआयची रक्कम स्थिर राहते. फ्लोटिंग रेटने गृहकर्ज मिळते.

---